विषय : खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपुर्तीबाबत. . . . . . . . . . . . . .

**(सर्व प्रवर्गातील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरुन घेणे.)**

---

**कालमर्यादा : दि. ३०/६/२०१५** क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१५/1726

दिनांक : 11 JUN 2015

प्रति,
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
अभियांत्रिकी पदवी /औषधनिर्माणशास्त्र पदवी महाविद्यालये.

मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे उपरोक्त विषयाचे सोबत जोडलेले क्र. १५/तंशिसं/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१४-१५/२३, दि. ०८/०६/२०१५चे पत्र पहावे. सदर पत्रात नमूद केल्यानुसार कार्यवाही करुन आपल्या संस्थेतील ईबीसी फॉर्म छाननी समितीमार्फत अर्जाची छाननी करुन दि. ३०/०६/२०१५ पर्यंत ह्या कार्यालयाकडे सादर करावेत.

या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यांत येते की, **प्रस्ताव सादर करतांना प्रत्येक ऑनलाईन अर्ज खालीलप्रमाणे जोडण्यांत यावा.**

१. ऑनलाईन अर्जाची रिसिट कम ॲकनॉलेजमेंट
(सदर रिसिटवर केवळ प्राचार्य/संचालकांची शिक्क्यासह स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.)
२. ऑनलाईन अर्ज
(अर्जाच्या शेवटी विद्यार्थी व विद्यार्थ्याच्या पालकाची स्वाक्षरी व **त्याखाली प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी अनिवार्य आहे.)**
३. मूळ उत्पन्नाचा दाखला
४. डोमिसाईल सर्टिफिकेट किंवा लिव्हींग सर्टीफिकेट
५. मागिल वर्षाच्या गुणपत्रिका
६. रेशनकार्डची छायांकीत प्रत
७. गॅप असल्यास मूळ प्रतिज्ञापत्राची नोटरी असलेली प्रत (Original affidavit should be submit)
८. वडील हयात नसल्यास मृत्यू दाखला
९. आधार कार्डाची छायांकीत प्रत (असल्यास)
१०. पासबुकची छायांकीत प्रत (पासबुक केवळ विद्यार्थ्यांच्या नावे असावे. संयुक्त खाते असलेल्या पासबुकची प्रत नसावी.)
११. **ईबीसी प्रस्ताव सादर करतांना आवश्यक असलेले "प्रमाणपत्र व हमीपत्र" तसेच विद्यार्थ्यांकडून आवश्यक असलेले "स्वयं घोषणापत्र" सादर करणे अनिवार्य आहे.**
(प्रमाणपत्र व हमीपत्र तसेच स्वयं घोषणापत्राशिवाय सादर होणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.)

महत्त्वाची टिप्पणी :
अर्जासोबत जोडावयाच्या सर्व छायांकीत प्रती साक्षांकीत केलेल्या असाव्यात.
(साक्षांकीत प्रती नसलेले व वरीलप्रमाणे विहीत कागदपत्र न जोडलेले अर्ज कोणतीही पूर्वसूचना न देता रिजेक्ट केले जातील.)
Important Note :
All Xerox with EBC form should be attested with Principal sign.
(Without attested copies & without valid document forms will be reject any prior intimation.)

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in


क्रमांक:१५/तंशिसं/अर्थस/ईबीसी/ऑनलाईन/२०१४-१५/२३

दिनांक : 8 JUN 2015

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/

अमरावती/नागपूर.

विषय :- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया विदयार्थ्याच्या शैक्षणिक शुल्कांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत . . .

( सर्व प्रवर्गातील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरुन घेणे).

खाजगी विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित संस्थामधील ज्या अभ्यासक्रमाचे शुल्क हे **"शिक्षण शुल्क समितीद्वारे"** ठरविण्यांत येते अशा संस्थामधील केन्द्रिय प्रवेश प्रक्रियेद्वारे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील (ओबीसी) तसेच यापूर्वी अर्ज भरु न शकलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांना (एन.एफ.आर. संस्थेतील विद्यार्थ्यासहीत) शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी **(ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर दिनांक ०८ जून २०१५ ते दिनाक ३० जून २०१५ पर्यंत अर्ज भरण्यासाठी लिंक देण्यात येत आहे. (शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून)**

सर्व विद्यार्थ्यांनी दिनांक ३० जून २०१५ पर्यंत संगणकीय प्रणालीवर भरलेल्या अर्जाची प्रत प्रमाणित करुन आवश्यक त्या कागदपत्रासह (विद्यार्थ्यांनी यापूर्वी कोणत्याही योजनेतून शैक्षणिक शुल्काचे लाभ घेतले नाही असे स्वयं घोषणापत्र सादर करणे अनिवार्य राहील तसेच इतर योजनेमधून लाभ मंजूर झाल्यास या योजनेद्वारे प्राप्त झालेली रक्कम शासन जमा करण्यासंबंधीसुध्दा घोषणापत्रामध्ये नमूद करावे.) संबंधीत सस्थेनी विद्यार्थ्याचे ऑनलाईन अर्ज छाननी करुन अर्ज दिनांक १० जुलै २०१५ पर्यंत

सबंधीत विभागीय कार्यालयास सादर करावेत. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी प्राप्त अर्जांची छाननी करुन अहवाल या कार्यालयास दि. १५ जुलै २०१५ पर्यंत सादर करावा.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:- १. प्रणाली विश्लेषण तथा समन्वयक तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या माहिती व पुढील कार्यवाही करीता.

२. महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या माहिती करीता.

ईबीसी पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जांचे प्रस्ताव सादर करताना
संस्थेने लेटरहेडवर सादर करावयाचे प्रमाणपत्र व हमीपत्र

**(प्रमाणपत्र व हमीपत्र एकाच लेटरहेडवर सादर करावे.)**

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०....-..... करिता या संस्थेतील एकूण ........ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत. त्यापैकी संस्थास्तरावर एकूण ....... अर्जांची छाननी, संस्थांतर्गत छाननी समितीमार्फत करण्यांत आली असून ....... एवढ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यांत आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| अर्ज प्रत्यक्ष<br>स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी | तपासणी<br>अधिकाऱ्याची स्वाक्षरी | अर्ज प्रमाणित<br>अधिकाऱ्याची स्वाक्षरी |

## हमीपत्र

या संस्थेमार्फत शैक्षणिक वर्ष २०....-.... करिता एकूण ....... अर्ज सादर करण्यांत येत असून सर्व अर्जांची छाननी सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संस्थेमध्ये ईबीसी अर्ज छाननीकरिता गठीत केलेल्या समितीमार्फत करण्यांत आली असून प्रत्येक अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे अचूक व योग्य जोडलेली आहेत. सोबतच्या अर्जामध्ये त्रुटी आढळल्यास व अर्ज नामंजूर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

संस्थाप्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का

विद्यार्थ्यांकडून घ्यावयाचे स्वयं घोषणापत्र

# स्वयं घोषणापत्र

मी, .............................................. श्री. .............................................. यांचा मुलगा/मुलगी, वय ......... वर्षे, राहणार ..............................................
..............................................

असे घोषित करतो की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये .............................................. ह्या महाविद्यालयात केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिये मार्फत .............................................. ह्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असून सदर शैक्षणिक वर्षात मी शासनाच्या कोणत्याही योजनेतून शैक्षणिक शुल्कांचा लाभ घेतलेला नाही. मला इतर योजनेतून लाभ मंजूर झाल्यास या योजनेद्वारे प्राप्त झालेली रक्कम शासनाकडे जमा करीन.

विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी